INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES

( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )

DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन

# (Chhatrapati Shivaji Maharaj's Approach to Womens)

**डॉ. मोहन काळकुटे**

इतिहास विभाग प्रमुख,

महिला कला महाविद्यालय, बीड

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/04.2023-43362327/IRJHIS2304009

**प्रस्तावना** :

मातृसत्ताक संस्कृती ही वैभवशाली भारताची खरी ओळख आहे. भारताला वैभवशाली बनविण्यासाठी अनेक स्त्रियांनी आपले सर्वस्व व कर्तृत्व पणाला लावल्याची नोंद इतिहासात सापडते. ऐतिहासिक काळात डोकावताना राष्ट्रमाता जिजाऊचे स्थान अग्रक्रमांकावर दिसते. महाराष्ट्राला दोन छत्रपती देणारे हे व्यक्तिमत्व समस्त स्त्री वर्गासाठी प्रेरणास्थान आहे. शिवपूर्वकाळात मुसलमानी अंमलाखाली होणाऱ्या जुलुमाने जनता त्रस्त होती. मुली व महिलांना पळवून नेऊन अन्याय व अत्याचार करणे, गुलाम स्त्रियांची विक्री होणे असे प्रकार सर्रास होत होते. शहाजीराजे आदिल शाहित सरदार होते पण दोघेही स्वराज्याचे स्वप्न पाहत होते. आई-वडिलांचे स्वप्न सत्यात उतरवून बहुजनाचे स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केले. अशा छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन कशा प्रकारचा होता हे आपण या शोधनिबंधात पाहणार आहोत.

**छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन** :

**उद्दिष्ट** :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

**कालखंड** :

या शोध निबंधाचा कालखंड हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडापुरता मर्यादित राहील.

**संशोधन पद्धती** :

या संशोधनाचे लेखन करताना इतिहास संशोधनातील वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

19 फेब्रुवारी 1630 रोजी पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर राजमाता जिजाऊंनी गोरगरिबांचे पालनहार करणारा स्वराज्याचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या शिवबाला जन्म दिला. सात ते आठ वर्षाच्या शिवरायास घेऊन जिजाऊ बंगलोरला शहाजीराजाकडे काही काळासाठी गेल्या. तेथे दोन वर्ष शहाजीराजांची स्वराज्य निर्मितीसाठी आवश्यक ते शिक्षण

व संस्कार शिवबाला केले. तिकडून पुण्यात परतताना शहाजीराजांनी राज्यकारभारास लागणारे पेशवे, मुजुमदार, डबीर, सबनीस इत्यादी अधिकाऱ्यासह व काही शिक्षकांसह राजमाता जिजाऊ व शिवबांना पाठवले. शिवाजी राजांना "प्रतिपच्चंदलेखेव वर्धिष्णु विश्ववंदिता शाहसूनो : शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते हि" मुद्रा व स्वराज्य ध्वज शहाजी राजांनी बनवून दिला आणि स्वराज्य निर्मितीचे स्वप्न शिवबांच्या मनात निर्माण केले. स्वराज्य व्हावे ही शहाजीराजे व राजमाता जिजाऊंची इच्छा होती, त्यानुसार राजे घडत होते.

मावळ प्रांतात फिरताना लोकांची दयनीय अवस्था, मुसलमानी अत्याचार, स्त्रियांचे अपहरण, धर्माचा प्रतिदिन होणारा ऱ्हास हे सारं शिवबा राजे पहात होते. राज्याचा राज्य कारभार, पत्रव्यवहार, रयतेच्या अडीअडचणी, समस्या हे सारं जिजाऊंच्या देखरेखीखाली ते शिकत होते. जिजाऊंनी राज्यकारभारात घेतलेले निर्णय व केलेले न्याय निवाडे राजे काळजीपूर्वक पाहत होते, आत्मसात करीत होते. त्यामुळे पुढील काळात राजांचा स्त्री विषयक दृष्टिकोन हा निकोप राहण्यास मदत झालेली दिसते. जिजाऊंच्या एकूणच विचारांचा प्रभाव स्वभावाची छाप उदारमतवादी, समतावादी नेतृत्व, गुण, उमेद, व्यक्तिमत्व हे सारे राजांच्या जडण-घडणीसाठी पायाभूत ठरलेले दिसते.

जिजाऊ सर्व निर्णय स्त्री सन्मान, स्त्री जातीबद्दल कळकळा व्यक्त करत तटस्थपणे घेत. त्यामुळे पुढे शिवाजी राजांनीही शत्रूच्या भाजीच्या देठाला व स्त्रीच्या केसालाही धक्का लागणार नाही याची काळजी घेण्याची सक्त ताकीद सैन्याला दिली होती. लढाईच्या वेळी स्त्रीया व मूल पकडणे हा गुन्हा मानला जात असे. परकीय स्त्रीचाही सन्मान करायची शिकवण त्यांना मिळाली होती व ती त्यांनी जपली. युद्धकाळात सैनिकांनी स्त्रियांच्या वाटेला जाऊ नये असा आदेश सैनिकांना देणारा छत्रपती शिवाजी महाराज हा प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक इतिहासातील एकमेव द्वितीय राजा होता. छत्रपती शिवाजी महाराजांना अगदी लहान वयातच स्त्री अत्याचाराचा निवाडा करायची संधी मिळाली. रांझाच्या पाटलाने पळवलेल्या एका गरीब शेतकऱ्याच्या मुलीवर अत्याचार केले. त्या मुलीने अब्रू गेली आता मरण बरं असे समजून जीव दिला. पाटलाला दरबारात हजर केले व जिजाऊंनी शिवबा राजांना निवाडा करायला सांगितला क्षणाचाही विलंब न करता शिवबांनी पाटलाचा हात कलम करायचा आदेश दिला. या कठोर निर्णयाने सगळीकडे आश्चर्य पसरले व शिवाजी राजांची दहशत बसू लागली. अशाच पनवेलच्या जवळच असलेल्या प्रबळगडाचा प्रमुख केसरी सिंह यांच्याशी झुंज देऊन तो मारला गेला. तेव्हा केसरी सिंहाची आई व दोन मुले तेथेच लपून होती. त्यांना शोधून त्यांना नमस्कार करून तिला पालखीचा मान व संपूर्ण संरक्षण देऊन तिच्या मूळ गावी पाठवले. तसेच कल्याणच्या सुभेदाराची ही घटना मराठ्यांच्या इतिहासात अविस्मरणीय आहे.

परस्त्रीला मातेसमान मानणाऱ्या छत्रपती शिवाजी राजांचा आदर्श आज समस्त पुरुषांनी घेण्याची गरज आहे. सावित्रीबाई देवजाई या किल्लेदार स्त्रीने आपल्या पतीच्या निधनानंतर सलग 27 दिवस किल्ला लढवला पण सकुजी गायकवाड या सेनापतीने तो जिंकला. सावित्रीबाईंने बिजेरीस आणले या सोडभावनेने तिच्यावर बलात्कार केला. हे शिवाजी राजांना समजतात त्यांनी विजयी सेनापतीची सुद्धा गय केली नाही. त्यांचे डोळे काढण्याचे फरमान काढले व जन्मभर तुरुंगात डांबले. आणि आज मान कुटुंबातील नात्यातील पुरुष आपल्याच स्त्रियांवर अन्याय, अत्याचार, बलात्कार करत आहेत व त्याकडे घरचेही दुर्लक्ष करतात किंवा ती गोष्ट धडकन याकडे कल असतो. हे भयानक वास्तव आज आहे.

संभाजी राजांना दूध पाजणाऱ्या धाराऊचा सन्मान असो रात्रीच्या वेळी तान्या लेकरासाठी ओढीन खडतर बुरुज उतरून लेकराला कवटाळणाऱ्या हिरकणीसाठी चोळी देऊन सन्मान करणे आणि त्या बुरुजाला हिरकणी बुरुज हे नाव या सर्वांची बीज जिजाऊंचा संस्कारात आढळतात.

शिवाजी राजांनी आपल्या सर्व पत्नींना योग्य तो मानसन्मान तर दिलाच पण कौटुंबिक निर्णयात सहभाग राज्यकारभारात सल्लामसलत केल्याचेही दिसते. शिवाजी राजांनी घेतलेले काही संभाजी राजांची पत्नी येसुना तर संभाजी राजा सोबत बालपणापासून राजकारणाचे प्रत्यक्ष धडे मिळाले. पुढे येसूबाई नाही सखी राज्ञी जयती असा शिक्कामोर्तब दिला होता. संभाजी राजांच्या गैरहजेरीत राजपत्रे देणे व आवश्यक काढण्याचा अधिकार येसूबाईंना बहाल केलेला दिसतो. संभाजी राजे दिलेरखानाकडे गेल्याने शिवाजी राजे हताश व विवश झाल्याने येसूबाईंनाच काही उपाय सुचवा असे म्हणून चर्चा करताना दिसतात. याचाच अर्थ शिवाजी राजे सारखेच सोने सोबत सल्लामसलत करतात हे लक्षात येते. पुढे राजारामाची पत्नी महाराणी ताराराणीनेही औरंगजेबाला नऊ वर्ष जेरीस आणण्याचा इतिहास आहे. राजमाता जिजाऊंनी लढाईचे शिक्षण घेतले होते तेच पुढे इतिहासात झिरपलेले दिसते. असे अनेक प्रसंग छत्रपती शिवरायांचा दूरदृष्टीकोन स्त्री पुरुष समानता स्त्री, स्वातंत्र्य, धर्मभावना, आदरांची भावना, स्त्रीकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन स्पष्ट करतात. शिवचरित्रातून काय शिकावे? या प्रश्नाचे उत्तर आपल्या जीवनाशी निगडित प्रत्येक गोष्ट समस्येची जोडून घेता येईल.

**निष्कर्ष** :

1) छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्री विषयक दृष्टिकोन अतिशय उदार (व्यापक) होता.
2) छत्रपती शिवाजी महाराजांनी हिरकणी सारख्या सामान्य स्त्रीचा यथोचीत सत्कार केला.
3) छत्रपती शिवाजीनी सावित्रीबाई देसाई यांच्यावर झालेल्या अन्यायावर योग्य तो न्याय दिला.
4) छत्रपती शिवाजी राजांनी बालवयातच स्त्री अत्याचाराचा निवाडा करण्याची संधी प्राप्त झाल्याचे दिसून येते.
5) छत्रपती शिवाजी महाराज आपली आई सर्व पत्नींचा व सुनबाई येसूबाईचा राज्यकारभारात सल्ला घेत असत

**संदर्भ ग्रंथ सूची** :

1) प्रा. मोरे दिनेश, शिवरायांचा स्त्री विषयक दृष्टिकोन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद-2004.
2) राणा अशोक, स्वराज्य संकल्पिका राष्ट्रमाता जिजाऊ, जिजाऊ प्रकाशन पुणे-2001.
3) प्रा. सावंत बी. एस., मराठ्यांचा प्रशासकीय आणि सामाजिक, आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन-1997.
4) डॉ. व्हटकर ज्योती, मराठा व पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील कर्तबगार स्त्रिया, दिलीप राज प्रकाशन, पुणे-2010.
5) दै. मराठवाडा, दै. सकाळ, दै. पुढारी, दै. लोकमत 19 फेब्रुवारी 2023.